भूमीसंपादन,पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरण यांचे
नांवे स्वीय प्रपंजी लेखा खाते सुरु करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्र.आरपीए २०१८/प्र.क्र.२५८/र-१

मादाम कामा रोड, मंत्रालय,मुंबई-४०००३२

दिनांक : १७ जुन,२०१९

संदर्भ: १) महसलू व वन विभाग अधिसूचना क्र.आरपीए-१४१५/प्र.क्र.४५/र-१, दि.१९.७.२०१८

२) महसूल व वन विभाग शास निर्णय क्र. आरपीए-२०१७/प्र.क्र२६८/र-१, दि.१९.१२.२०१७

३) निबंधक, भूमीसंपादन,पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरण, नागपूर यांचे पत्र क्र.आस्था/कार्या क्र.१/२०१८/१२६, दि.२१.८.२०१९

प्रस्तावना:

केंद्र शासनाने "भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ " हा नवीन अधिनियम भूसंपादन व पुनर्वसन यासाठी एकत्रितपणे पारित केला आहे. सदर अधिनियम दि.१.१.२०१४ पासून अंमलात आलेला असून या अधिनियमातील १०९ कलमान्वये शासनाने नियम तयार केले आहेत. सदर नियम दि.२७.८.२०१४ रोजी राजपत्रात प्रसिध्द करण्यात आले आहेत. भूसंपादन "भूमीसंपादन व पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ मधील कलम ५१च्या तरतूदीस अनुसरुन भूमी संपादनाच्या संबंधातील विवाद तातडीने निकालात काढण्याच्या प्रयोजनार्थ सर्व महसूल विभागासाठी एक भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. सदर प्राधिकरणासाठी महसूल व वन विभागाच्या दि.१९.७.२०१८ रोजीच्या अधिसूचनेनुसार मा.पिठासीन अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली असून मा.पिठासीन अधिकारी यांनी पदभार स्विकारुन न्यायालयीन कामकाजास सुरवात केलेली आहे. या अनुषंगाने भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरण, नागपूर यांचेकडे भूमीसंपादन अधिनियम २०१३ अंतर्गत कलम ६४, प्रकरण ५ व ६ आणि कलम ७६ अन्वये प्रकरणे प्राप्त झालेली आहेत. विभागाच्या दि.१९.१२.२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार निबंधक (तहसिलदार) यांना कार्यालय प्रमुख तथा आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. भूमीसंपादन अधिनियम २०१३ अंतर्गत प्रकरण-९ नुकसान भरपाई संविभाजन यातील कलम ७६ नुसार संविभाजनासंबंधी विवाद भूसंपादन संस्थाकडून प्राप्त प्रकरणांमध्ये जमा होणाऱ्या रक्कमा स्वीस प्रपंजी खात्यामध्ये जमा करणे आवश्यक असल्याने नवीन स्वीय प्रपंजी खाते सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:-

तहसिलदार (निबंधक), महाराष्ट्र भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरण, नागपूर यांना भूमीसंपादन अधिनियम २०१३ अंतर्गत प्रकरण-९ नुकसान भरपाई संविभाजन यातील कलम ७६ नुसार संविभाजनासंबंधी विवाद भूसंपादन संस्थाकडून प्राप्त प्रकरणांमध्ये जमा होणाऱ्या रक्कमाचा विनियोग करण्यासाठी त्यांच्या नावे प्रपंजी खाते (Personal Ledger Account) उघडण्यास,महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ (खंड-१) मधील नियम ४९५ च्या तरतुदीअन्वये प्राप्त अधिकारात अटीच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे:-

१. The amounts received by the Registrar, Maharashtra Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Authority, Nagpur in relation to the matters referred to the Authority under section ६४,७५, ७६, ७७. ७८ and ७९ of the Right to Fair Compensation And Transparency In Land Acquisition, Rehabilitation & Resettlement Act, २०१३ only be credited to this PLA. No other Money other than above shall be credited to this PLA.
२. The amount may be withdrawn from this PLA only for the award declared by the Registrar, Maharashtra Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Authority, Nagpur in respect of matters referred to the Authority under Section ६४,७५,७६,७७ ,७८ and ७९ of The Right to Fair Compensation And Transparency In Land Acquisitions, Rehabilitation & Resettlement Act, २०१३. No Money shall be withdrawn from this PLA for any purpose other than above.
३. PLA shall be used only for the purpose for which it has been formed.
४. A fresh concurrence shall be sought for any change in the purpose of deposit of funds into the PLA and withdrawals of the funds therefrom.
५. In no circumstances, this PLA shall receive any credit by debiting the consolidated fun of the state.
६. All cheques issued on or after १ st January each year should be routed through Treasury Officer.
७. As per the revised provision of Rule ४९५, if the PLA is not operated for more than one completed accounting years, it shall be closed.
८. The Administrator shall be responsible for reconciliation with Treasury/Sub treasury.
९. All provision of Accounting Rules for treasuries १९९२ and all provisions of PLA in view of MTR १९६८ Vol.I shall apply to this PLA.
१०. The Administrator should ensure proper maintenance of Account.
११. This PLA shall be subject to Audit as per rule.

२. सदरहू शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३८८/१८/कोप्र-५, दिनांक २५.१०.२०१८ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार व महालेखापाल, महाराष्ट्र-२/नागपूर यांचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक TM/Gr.II /Registrar, Maharashtra Land Acquisition, Rehabilitation and resettlement Authority, Nagpur/UOR ०३/२०४, **दि.२८.५.२०१९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.**

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक २०१९०६१९१६५८४६१९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shivaji P Karwar

Digitally signed by Shivaji P Karwar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0dbd15a4cda43063e726a7e4b0f366443319057727eda4431c6e339fb479ef33, cn=Shivaji P Karwar
Date: 2019.06.19 16:56:49 +05'30'

(शि.पां.कारवार)
कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग.

प्रति, १) मा.राज्यपाल यांचे सचिव,राजभवन,मलबार हिल,मुंबई

२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई-४०००३२
३) मा.अध्यक्ष,विधानसभा यांचे खाजगी सचिव,विधानभवन,मुंबई
४) मा.उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन,मुंबई
५) मा.विरोधी पक्षनेता (विधानसभा/विधानपरिषद) यांचे खाजगी सचिव,विधानभवन,मुंबई
६) मा. मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
२) मा. राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
३) मा. सचिव (मदत व पुनर्वसन) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
४) अप्पर मुख्य सचिव (वित्त विभाग), मंत्रालय, मुंबई
५) महालेखापाल -१/२, (लेखा व अनुज्ञेयता)/लेखापरिक्षा, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
६) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर
७) निबंधक, महाराष्ट्र भूमीसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरण, नागपूर
८) वित्त विभाग (कोषा, प्रशा-५/अर्थ-६), मंत्रालय, मुंबई
९) विभागीय आयुक्त् कार्यालय, नागपूर
१०) जिल्हाधिकारी, नागपूर
११) र-१ कार्यासन निवडनस्ती.